# जाहीर सूचना

## *रत्नागिरी जिल्हयातील नदी/खाडीपात्रातील ड्रेझर रेती/वाळू गटांचा जाहीर फेरलिलाव*

सर्व जनतेच्या माहितीसाठी जाहीर करणेत येते की, मुंबई गौण खनिज उत्खनन नियम १९५५ च्या ३९ अे व शासन महसुल व वन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक गौखनि/१०/०२०८/ प्र.क्र.३२/ख,दिनांक २५/१०/२०१० नुसार सन २०११-२०१२ या वर्षाकरीता रत्नागिरी जिल्हयातील दाभोळ खाडीपात्र व जयगड खाडीपात्रातील खाली नमुद केलेल्या रेती गटात उपलब्ध असलेल्या रेती/वाळु साठयाचे उत्खनन/विक्री मोहोरबंद निविदा मागवुन तसेच खुल्या पध्दतीने एकत्र पध्दत अवलंबुन दिनांक १८/१०/२०११ रोजी व फेरलिलाव ३१/१०/२०११ व २९/११/२०११ रोजी झालेला आहे.सदरहु लिलावामध्ये खालील रेती गटांचे लिलावाची निविदा/अगर कोणही न बोलल्याने रेती लिलाव झालेला नाही. त्यामुळे शासन महसुल व वन विभागाकडील निर्णय क्रमांक शासन निर्णय क्रमांक गौखनि/१०/०२०८/प्र.क्र.३२/ख, दिनांक २५/१०/२०१० मधील परिच्छेद **भाग ऐ मधील ७(ड)(१)** मधील तरतुदीनुसार हातची किंमत जास्तीत जास्त २५ टक्के कमी करुन त्या रेती गटांचा फेर लिलाव करण्यास विभागिय आयुक्त कोकण विभाग यांजकडील पत्र क्रमांक मशा/कार्या-२/गौखनि/सीआर-२२८५/कावि-१८३० दिनांक ०२/११/२०११ अन्वये मंजुरी मिळालेली आहे.

सबब रत्नागिरी जिल्हयातील खाली नमूद केलेल्या ड्रेझर्स रेती गटाकरीता मोहोरबंद निविदा मागवून तसेच खुल्या लिलाव पध्दतीने एकत्र पध्दत अवलंबून **दिनांक १७/१२/२०११ रोजी सकाळी ११.३० वाजता** अल्पबचत सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, रत्नागिरी येथे होणार आहे. **जाहीर फेरलिलावाच्या व मोहोरबंद निविदांच्या अटी/शर्तीबाबत माहिती जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी, खनिकर्म शाखेमध्ये व रत्नागिरी जिल्हयातील सर्व तहसिलदार, सर्व उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयात पाहणेसाठी उपलब्ध राहतील.**

| अ.क्र. | रेती/वाळू उत्खनन करावयाचे क्षेत्राचा तपशिल | उत्खननाचे साधन | गट क्रमांक | उपलब्ध कालावधीकरीता उत्खननासाठी अनुज्ञेय साठा (ब्रासमध्ये) | सन २०११-१२ करीता लघुत्तम किंमत ( रुपयात ) | २५ टक्के रक्कम कमी करुन प्रस्तावित लघुत्तम किंमत | निविदेबाबत भरावयाची अनामत रक्कम (रूपयात) (कॉलम ७ च्या ३% ) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | **दाभोळ खाडी/वाशिष्ठी नदी**<br>वाघिवरे ते चिवेली<br>चार्ट नं.९५९ | १ ड्रेझर | डि-१ | ३४६७६ | ४७३६७४१६ | ३५५२५५६२ | १०६५७६७ |
| २ | **दाभोळ खाडी/वाशिष्ठी नदी**<br>चिवेली ते सुतवी<br>चार्ट नं.९५९ | १ ड्रेझर | डि-२ | ३४७३५ | ४७४४८०१० | ३५५८६००८ | १०६७५८० |
| ३ | **दाभोळ खाडी/वाशिष्ठी नदी**<br>सुतवी ते ग्रंागई<br>चार्ट नं.९५९ | १ ड्रेझर | डि-३ | ३३९५१ | ४६३७७०६६ | ३४७८२८०० | १०४३४८४ |
| ४ | **दाभोळ खाडी/वाशिष्ठी नदी**<br>ग्रंागई ते ग्रांगई भोईवाडी<br>चार्ट नं.९५९ | १ ड्रेझर | डि-४ | ३५००९ | ४७८२२२९४ | ३५८६६७२१ | १०७६००२ |
| ५ | **दाभोळ खाडी/वाशिष्ठी नदी**<br>ग्रंागई भोईवाडी ते होडखाड<br>चार्ट नं ९६० | १ ड्रेझर | डि-५ | २८५२० | ३८९५८३२० | २९३१८७४० | ८७९५६२ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | **<u>दाभोळ खाडी/वाशिष्ठी नदी</u>**<br>होडखाड ते मालदोली<br>चार्ट नं ९६० | १ ड्रेझर | डि-६ | २९००२ | ३९६१६७३२ | २९७१२५४९ | ८९१३७६ |
| ७ | **<u>दाभोळ खाडी/वाशिष्ठी नदी</u>**<br>मालदोली ते बहिरवली जेटी नं २ चार्ट नं ९६० | १ ड्रेझर | डि-७ | २८११० | ३८३९८२६० | २८७९८६९५ | ८६३९६० |
| ८ | **<u>दाभोळ खाडी/वाशिष्ठी नदी</u>**<br>बहिरवली जेटी नं २<br>ते बुध्दवाडी करंबवणे<br>चार्ट नं ९६० | १ ड्रेझर | डि-८ | २८७७० | ३९२९९८२० | २९४७४८६५ | ८८४२४६ |
| ९ | **<u>दाभोळ खाडी/वाशिष्ठी नदी</u>**<br>बुध्दवाडी ते बहिरवली जेटी नं १ चार्ट नं ९६० | १ ड्रेझर | डि-९ | २८१९९ | ३८५१९८३४ | २८८८९८७६ | ८६६६९६ |
| १० | **<u>जयगड खाडी/शास्त्री नदी</u>**<br>चवे ते भातगांव<br>चार्ट नं ११२० | १ ड्रेझर | डि-१० | २०३१८ | ८१२७२०० | ६०९५४०० | १८२८६२ |
| ११ | **<u>जयगड खाडी/शास्त्री नदी</u>**<br>भातगांव ते राई करजुवे<br>चार्ट नं ११२० | १ ड्रेझर | डि-११ | २०३१८ | ८१२७२०० | ६०९५४०० | १८२८६२ |

१ ) रेती गटात रेती उत्खनन करण्याचा कालावधी रेती गटाचा ताबा घेतल्यापासून **दिनांक ३१/७/२०१२** पर्यंत राहील व कोणत्याही कारणास्तव कोणत्याही स्वरुपाची मुदतवाढ देण्यात येणार नाही.

२) उपरोक्त रेती गटाच्या फेरलिलावाचे निविदेचे कोरे नमूने/लिलावात भाग घेण्यासाठी अर्जाचे नमुने लिलावाच्या अटी/शर्तीसह स्वतंत्रपणे रक्कम रु.२०००/- रोख प्रत्येकी जमा केल्यावर जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी (खनिकर्म शाखा) यांचे कार्यालयात लिलाव जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ते **दिनांक १५/१२/२०११ पर्यंत** (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून ) कार्यालयीन वेळेत व **दिनांक १६/१२/२०११** रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत प्राप्त होतील. निविदेच्या/अर्जाचे नमुने अहस्तांतरणीय असतील व ज्याने नमुने खरेदी केले असतील त्यालाच लिलावात भाग घेता येईल किंवा निविदा सादर करता येईल.

३) उपरोक्त रेती फेरलिलावात भाग घेवु इच्छीणाऱ्या व निविदा भरु इच्छीणाऱ्या व्यक्ती, संस्था यांनी अनामत रक्कम म्हणुन रेती वाळु गटाच्या लघुत्तम किंमतीच्या ३% रक्कम (रकाना नं ७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे) अनामत रक्कम निविदा किंवा अर्जासोबत फेरलिलाव जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ते **दिनांक १६/१२/२०११ पर्यंत** (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी ११.०० ते सायंकाळी ४.३० पर्यंत निविदा सादर करताना/लिलावात भाग घेणेबद्दल अर्ज सादर करताना अर्जा समवेत "जिल्हाधिकारी रत्नागिरी " यांचे नावे काढलेल्या डिमांड ड्राफ्टद्वारे भरावी लागेल.

४) उपरोक्त संबंधित गटाच्या परिपूर्ण भरलेल्या मोहोरबंद निविदा/लिलावात भाग घेण्याचा अर्ज तसेच बयाणा रक्कम राष्ट्रीयकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टद्वारे जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी येथे लिलाव जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ते **दिनांक १५/१२/२०११** पर्यंत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी (खनिकर्म शाखा) येथे निविदा/अर्ज स्विकारल्या जातील. **दिनांक १६/१२/२०११ रोजी सायंकाळी ४.३० वाजेपर्यंत निविदा/फेरलिलावात भाग घेण्याचा अर्ज/ बयाणा रक्कम स्विकारली जाईल.**

५) मोहोरबंद निविदा भरणाऱ्या व्यक्ती/संस्था यांना खुल्या लिलावातही भाग घेता येईल

६) **दिनांक १७/१२/२०११ रोजी** खुल्या फेरलिलावाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्याच ठिकाणी व त्याच वेळी मोहोरबंद निविदा उघडण्यात येतील व खुला लिलाव व मोहोरबंद निविदा यामध्ये जी जास्त रक्कम येईल त्याच्या नावे निविदेतील नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून लिलाव अंतिम करण्यात येईल.

७) ज्या व्यक्तींच्या नांवे लिलाव/निविदा अंतिम करण्यात येईल त्याला देकाराच्या रकमेच्या ¼ रक्कम त्याच दिवशी डिमांड ड्राफ्ट/रोख रक्कम चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडिया रत्नागिरी शाखा (खारेघाट रोड) रत्नागिरी किंवा जिल्हाधिकारी कार्यालय (खनिकर्म शाखा) रत्नागिरी यांच्याकडे जमा करावी लागेल. जर देकाराच्या रकमेच्या ¼ रक्कम लिलावधारकाने त्याच दिवशी शासन जमा केली नाही तर त्यांनी भरलेली बयाणा रक्कम जप्त करण्यात येवुन त्यांचें नावे मंजुर केलेला लिलाव/निविदा रद्द करणेत येईल व त्या गटाचा फेरलिलाव लावण्यात येईल, तसेच अशा व्यक्तीविरुध्द प्रचलित नियमानुसार कार्यवाही करणेत येईल.

८) ज्याच्या नावे लिलाव मंजूर करण्यात येईल त्याला संबधित उत्खनन क्षेत्राकरीता ''महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड'' यांनी निश्चित केलेल्या सर्वेक्षण शुल्काची रक्कम **''हायड्रोग्राफर, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई'** यांच्या नावे काढलेल्या धनादेश किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे जमा करावी लागेल.

९) महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने उत्खननासाठी दिलेल्या नाहरकत प्रमाणपत्रा सोबत दिलेल्या अटी व शर्ती तसेच पर्यावरण विभागाकडील अटी व शर्ती निविदेसोबत अनुक्रमे परिशिष्ठ १ व परिशिष्ठ २ प्रमाणे जोडण्यात आलेल्या आहेत. सदरहु अटी व शर्ती यशस्वी लिलाव/निविदा धारकांना बंधनकारक राहतील. त्याचप्रमाणे आवश्यक त्या खात्याकडुन पुर्व परवानग्या यशस्वी लिलावधारकांना घेणे बंधनकारक राहतील.

१०) लिलाव स्विकारणे, तहकूब करणे, पुढे ढकलणे अथवा रद्द करणे किंवा लिलावाच्या दृष्टिने आवश्यक कार्यवाही बाबतच्या अंतिम निर्णयाचे अधिकार जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचेकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

११) लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्ती/संस्था यांना विक्रीकर विभागाचे TIN व आयकर विभागाचे PAN नंबर व त्यासंबधी कार्डाची साक्षांकित प्रत निविदे सोबत जोडणे आवश्यक आहे.

१२) ज्या व्यक्तीच्या नावे लिलाव अंतिम करण्यात येईल त्या व्यक्तीनी पर्यावरण शुल्कापोटी उच्चतम बोलीच्या २ टक्के इतकी रक्कम पर्यावरण शुल्क म्हणुन रेती गटाचा ताबा देणेपुर्वी भरणे बंधनकारक राहील.

१३) महाराष्ट्र शासनाचे दिनांक २५/१०/२०१० चे रेती लिलाव धोरणातील अट क्रमांक ४ (इ) अन्वये पर्यावरण विषयक विभागाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच केंद्रीय पर्यावरण विभागाने दिनांक १४/०९/२००६ च्या अधिसुचनेनुसार दिलेल्या व राज्य पर्यावरण विभाग यांनी दिनांक २४/१०/२००८ च्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे तसेच पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडील पत्र क्रमांक सीआरझेड-२०००/५३६ /सीआर-५२/डेस्क-१/दिनांक ०१/११/२००० यामधील अटी व वेळोवेळी निर्गमीत केलेल्या पर्यावरण विभागाकडील अटी लिलावधारकांवर बंधनकारक राहील.

१४) सदर लिलावातील ड्रेझर रेती गटाचे प्रस्ताव हे ५ ते ५० हेक्टरच्या मर्यादेत असल्याने दिनांक २५/१०/२०१० रेती धोरणातील अट-४ (इ) अन्वये राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाने गठित केलेल्या समितीची मान्यता असणे बंधनकारक आहे सदर समितीच्या पर्यावरण विषयक परवानगीस अधिन राहुन सदरचे रेती लिलाव घेण्यात येत आहेत. पर्यावरण समितीच्या मंजुरी शिवाय यशस्वी निवीदा/लिलावधारकाची निविदा/बोली अंतिम केल्यानंतर करारनामा करणे, उत्खननासाठी रेती गटाचा ताबा देणे इत्यादी पुढील प्रक्रीया पुर्ण करता येणार नाहीत. पर्यावरण समितीद्वारे मान्यता देताना जादा अटी घातल्यास त्या लिलावधारकावर बंधनकारक राहतील.

लिलाव गटाचा तपशिल, लिलावाच्या अटी व शर्ती, उत्खननासाठी राखीव क्षेत्राची माहिती व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने उत्खननासाठी दर्शविलेल्या क्षेत्राचे नकाशे इत्यादी माहिती जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी (खनिकर्म शाखा) येथे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. रेती गटाचा लिलाव किंवा त्याचा ताबा घेणेपूर्वी रेती गटाची किंवा त्यासंबधी आवश्यक बाबीची खात्री करणेची जबाबदारी संबधित लिलावधारकाची राहील.

लिलाव जाहिरनाम्याचा सविस्तर तपशिल **<u>www.ratnagiri.gov.in</u>** या संकेत स्थळावर (website) उपलब्ध आहे.

**सही/-**
**(मधुकर भि.गायकवाड) भा.प्र.से**
**जिल्हाधिकारी रत्नागिरी**

क्रमांकः-खनिकर्म/२/हातपाटी/वाळू फेरलिलाव/२०११-२०१२
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी,
दिनांक :-०५/१२/२०११